**प्रेसनोट** दि. 23/07/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून बारामती एम. आय. डी. सी. डेपोचे वाहतूक नियंत्रक व एस. टी. को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई चे संचालक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष वय 26 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री अनिल तुकाराम बनकर, वय 51 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-वाहतूक नियंत्रक नेमणूक- बारामती एम. आय. डी. सी. डेपो तसेच संचालक एस. टी. को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई (वर्ग 3), रा. ठी. - मु. पो. पणदरे, तालुका बारामती, जिल्हा-पुणे. |
| सुरवातीची लाच मागणी | 5,00,000/- (पाच लाख रूपये) लाच मागणी केली. |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | 6,00,000/- (सहा लाख रूपये) लाच मागणी केली. |
| पडताळणी दिनांक | दिनांक 23/07/2026 रोजी |
| सापळा रक्कम | 4,00,000/- (चार लाख रूपये) |
| सापळा तारीख व वेळ | दिनांक 23/07/2026 रोजी 18.19 वा. |
| ठिकाण | बारामती एस.टी. स्टँड समोरील रोडवर आलोसे यांच्या ताब्यातील चार चाकी वाहन क्र. MH42 BE 5787 हीमध्ये |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8806321817) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9881873330) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांनी दिनांक 20/07/2026 रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांचे बारामती शाखेचे इमारतीचे फर्निचर नूतनीकरणाचे काम केले होते. सदर कामाचे तक्रारदार यांचे रूपये 48,60,455/- बिल झाले होते. त्यापैकी तक्रारदार यांना 40 लाख मिळाले असून उर्वरित रु. 8,60,455/-, तसेच त्यांनी केलेल्या इतर किरकोळ कामाचे रूपये 4,98,000/- असे त्यांना मिळणे बाकी होते. यातील आरोपी लोकसेवक श्री अनिल बनकर हे एस.टी. को-ऑपरेटिव्ह बँक लिमीटेड, मुंबई या सहकारी बँकेचे संचालक आहेत. आरोपी लोकसेवक श्री अनिल बनकर यांनी तक्रारदार यांच्या कामाचे रूपये 8,60,455/- रकमेची मंजुरी एस. टी. को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड मुंबई या सहकारी बँकेचे संचालक मंडळाकडून प्राप्त करून त्याची ऑर्डर आणून स्वतः जवळ ठेवली होती, लोकसेवक श्री अनिल बनकर यांनी तक्रारदार यांच्याकडे ती ऑर्डर बॅकेत देण्याकरिता रूपये 4,00,000/- तसेच उर्वरित रकम रूपये 4,98,000/- मिळवून देण्याकरीता रूपये 1,00,000/- अशी एकूण पाच लाख रूपये लाचेची मागणी केली होती.

वरील प्रमाणे तक्रार प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक 23/07/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान आ. लो. से. श्री. अनिल बनकर यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष एस. टी. को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई या सहकारी बँकेचे संचालक मंडळाकडील 8,60,000/- मंजुरीची ऑर्डर देण्याकरिता रूपये 4,60,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रूपये 4,00,000/- लाचेची मागणी केली, तसेच उर्वरित 4,98,000/-मंजूर करण्याकरिता व डिपॉझिट रक्कम 5,00,000/- परत देण्याकरिता 2,00,000/- अशी एकूण रूपये 6,00,000/- लाचेची मागणी करून सुरुवातीस 4,00,000/- स्वीकारण्याचे मान्य केले आणि पुढील बिल मंजूर झाल्यानंतर 2,00,000/- रूपये स्वीकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे झालेल्या लाच मागणीच्या अनुषंगाने दिनांक 23/07/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक अनिल बनकर यांनी तक्रारदाराकडून बारामती एस.टी. स्टँड समोरील रोडवर आलोसे यांच्या ताब्यातील चार चाकी वाहन MH42 BE 5787 मध्ये लाचेची रक्कम रूपये 4,00,000/- पंचासमक्ष स्वीकारली असता 18.19 वा. रंगेहात पकडण्यात आले आहे.

वरील आरोपीस ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

23/07.

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे